

शिक्षण मंत्रालय
MINISTRY OF
EDUCATION

सत्यमेव जयते

# शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने

**Marathi** / मराठी

मार्गदर्शक दस्तऐवज, २०२३

**परिच्छेद ५.२०, एन.ई.पी २०२०**

*“"शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांनुसार (एन.पी.एस.टी) एक सर्वसाधारण सामान्य मार्गदर्शक तत्त्वे इ.स. २०२० पर्यंत विकसित केले जातील.राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे द्वारे सामान्य शिक्षण परिषद अंतर्गत त्याच्यात पुनर्रचना केली जाईल आणि त्यासंबंधी व्यावसायिक मानक स्थापन संस्था यांच्याशी सल्ला मसलत केली जाईल. एन.सी.आर.टी., एस.सी.ई.आर.टी. आणि इतर विविध प्रदेशातील शिक्षक, शिक्षण तयारी आणि विकासातील तज्ज्ञ संस्था, व्यावसायिक शिक्षणातील तज्ज्ञ संस्था आणि उच्च शिक्षण संस्था मानकांमध्ये विविध स्तरावरील कौशल्य / या स्तरावरील शिक्षकाच्या अपेक्षित भूमिका आणि त्या टप्प्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांचा समावेश यात असेल. या कामगिरीच्या मूल्यमापनासाठी प्रत्येक स्तराकरता मानकांचा समावेश असेल,जे नियमित पणे केले जाईल. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने सेवापूर्व शिक्षक शिक्षण कार्यक्रमांची रचना देखील सूचित करेल. हे कार्यक्रम नंतर राज्यांद्वारे स्वीकारले जातिल आणि त्याच्या आधारावर शिक्षक व्यावसायिक व्यवस्थापनाचे सर्व पैलू ठरविले जातील. त्यामध्ये पगारवाढ, पदोन्नती आणि इतर मान्यता याचा देखील समावेश असेल. पदोन्नती आणि पगारवाढ कार्यकाळ किंवा ज्येष्ठतेच्या आधारावर होणार नाही;तर केवळ अशानिश्चित केलेल्या मूल्यांकनाच्या आधारावर होतील. यंत्रणेच्या परिणाम कारकतेचे काटेकोरपणे अनुभवजन्य विश्लेषण करून त्याच्या आधारावर इ.स. २०३० मध्ये व्यावसायिक मानकांचे परीक्षण व सुधारणा केल्या जातील आणि त्यानंतर असे परीक्षण दर दहा वर्षांनी केले जाईल.”*

*“‘एक चांगली शिक्षणसंस्था अशी असते ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थी आहे तसा स्विकारला जातो आणि त्याच्या प्रगतीची काळजी घेतली जाते. जिथे सुरक्षित आणि प्रेरणादायी शिक्षण वातावरण उपलब्ध असतो. जिथे विविधांगी शैक्षणिक अनुभव देण्याची व्यवस्था केली जाते आणि जिथे उत्तम भौतिक पायाभूत सुविधा आणि शिक्षणासाठी योग्य साधने उपलब्ध असतात. अश्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रत्येक शैक्षणिक संस्थेचे ध्येय असले पाहिजे. तथापि त्याचवेळी संस्थांमध्ये आणि शिक्षणाच्या सर्व टप्प्यांवर अखंड एकात्मिक आणि समन्वय असणे आवश्यक आहे.”*

*“A good education institution is one in which every student feels welcomed and cared for, where a safe and stimulating learning environment exists, where a wide range of learning experiences are offered, and where good physical infrastructure and appropriate resources conducive to learning are available to all students. Attaining these qualities must be the goal of every educational institution. However, at the same time, there must also be seamless integration and coordination across institutions and across all stages of education”.*

**Dharmendra Pradhan**
Hon'ble Education Minister;
Skill Development and Entrepreneurship
Government of India
Shastri Bhawan
New Delhi-110001

**धर्मेंद्र प्रधान,**
माननीय शिक्षण, कौशल्य
वेकास आणि उद्योजकता मंत्री
भारत सरकार,
शास्त्री भवन,
नवी दिल्ली – ११०००१



## संदेश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एन.ई.पी) २०२० हे राष्ट्राच्या उच्चतम शैक्षणिक मार्गक्रमणासाठी मार्गदर्शक म्हणून काम करते. शिक्षणाच्या भविष्याचा वेध घेणाऱ्या विचारातून आणि दृष्टीकोनातून शिक्षक शिक्षण प्रणालीसाठी ते मार्ग मोकळा करते आणि जे केवळ ज्ञानच देत नाही तर शिकण्याची आवड, चिकित्सक विचार आणि सर्जनशीलता देखील देते. २१ व्या शतकातील आव्हाने आणि संधी साठीजे गुण शिक्षकांना तयार करण्यासाठी अपरिहार्य आहेत. भविष्यातील पिढीचे विचार घडविण्यात शिक्षकांची महत्वाची भूमिका राहिली आहे. हे धोरण मान्य करते की शिक्षकांना आवश्यक साधने आणि ज्ञानाने सुसज्ज करणे हे अपरिहार्य आहे.

भविष्यातील पिढीचे विचार घडविण्यात शिक्षकांची महत्वाची भूमिका राहिली आहे. हे धोरण मान्य करते की शिक्षकांना आवशयक साधने आणि ज्ञानाने सुसज्ज करणे हे अपरिहार्य आहे. प्रभावी अध्यापन पद्धतींसाठी अपेक्षा आणि मार्गर्दर्शक तत्त्वे स्पष्ट करून शिक्षणाची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी शिक्षकांसाठी व्यायसायिक मानांकने आवश्यक आहेत. ही मानांकने शिक्षकांची कौशल्ये, ज्ञान आणि कार्यक्षमतेला आकार देण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतात.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद ने मार्गदर्शक तत्त्वे, अपेक्षित जबाबदाऱ्या आणि क्षमता विकसित करण्यासाठी शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने मार्गदर्शक तत्त्व प्रणाली विकसित केली आहेत.विविध स्तरावरील कौशल्य आणि व्यावसायिक कारकीर्दीच्या विविध टप्प्यांमध्ये शिक्षकाच्या भूमिकेत ही तत्त्वे अंतर्भूत केली आहेत. ही तत्त्वे प्रविण आणि प्रगातीशील अध्यापन शक्ती विकसित करण्यासाठी एक मानक म्हणून काम करतात.

मला विश्वास आहे की, सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आपल्या देशाचे शैक्षणिक अवकाश सकारात्मक होईल. येणाऱ्या पिढयांना फायदा होईल.

**धर्मेंद्र प्रधान**

## संदेश



**अन्नपूर्णा देवी**

माननीय राज्य शिक्षण मंत्री,

शिक्षण मंत्रालय,

भारत सरकार

शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने ने अध्यापन व्यवसायाचा दर्जा उंचावण्याच्या आणि सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्याच्या वचनबद्धते मध्ये महत्त्वपूर्ण टप्पा निश्चित केला आहे. एन.पी.एस.टी मार्गदर्शक दस्तऐवज सखोल सल्ला-मसलत संशोधन आणि शिक्षक, तज्ञ, तज्ञ संस्था आणि शिक्षण क्षेत्रातील इतर संबंधित घटकांच्या सहकार्याने तयार केले गेले आहे. ही मानांकने आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि स्वभाव समाविष्ट करतात जे २१ व्या शतकातील प्रभावी शिक्षणाची व्याख्या करतात. एन.पी.एस.टी मार्गदर्शक दस्तऐवज सर्व समावेशक आराखडा प्रदान करतो जे केवळ शिक्षकांच्या स्पष्ट अपेक्षा ठरवत नाही;तर व्यवसाय व्यवस्थापनासाठी नैतिक व नीतिशास्त्र विषय ज्ञान आणि पुरावे निर्माण करण्याची संस्कृती देखील वाढवते.

मी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद आणि इतर जे मानकांच्या विकासात महत्वाची भूमिका बजावणारे सर्वभागधारक आहेत त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

---

## संदेश



**संजय कुमार**

भारतीय प्रशासनिक सेवा

सचिव, शालेय शिक्षण व साक्षरता

विभाग, शिक्षण मंत्रालय

भारत सरकार

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने भारतातील शिक्षक शिक्षण क्षेत्रात परिवर्तनात्मक सुधारणा घडवून आणल्या आहेत. सर्वांसाठी सर्वांगीण आणि दर्जेदार शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या धोरणाने अध्यापन व्यवसायाच्या विकासावर विशेष भर दिला आहे आणि सर्वसुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षकांना स्थान दिले आहेत. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद ने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची सर्व उद्दिष्टे लक्षात घेऊन शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने यांनी एक सामान्य तत्त्वे साध्य करण्यासाठी एक सर्व समावेशक मार्गदर्शक दस्तऐवज विकसित केला आहे. चर्चा/सल्ला मसलत आणि विविध संस्थां सोबतच्या सहकार्याच्या मालिकेवर आधारित एक दस्तऐवज जो निम्नस्तरा पासून उच्चतम स्तराकडे नेणारा दृष्टीकोन आणि संशोधनाच्या विविध स्तरानुसार तयार करण्यात आला आहे. हा मार्गदर्शक दस्तऐवज शिक्षकांची सक्षमता विकसित करण्यात प्रेरणादायी ठरेल आणि जागतिक मानकांच्या बरोबरीने सक्षम बनण्यास शिक्षकांना तयार करेल अशी माझी अपेक्षा आहे.

मी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद आणि या कार्यात सहभागी असलेल्या सर्व संबंधितांचे अभिनंदन करतो.

## संदेश



प्रो० योगेश सिंह

अध्यक्ष, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद, नवी दिल्ली

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये उच्च गुणवत्तेच्या अध्यापनावर भर देण्यात आला आहे जे शिक्षकांच्या कार्याची व्याप्ती आणि २१ व्या शतकातील अपेक्षित कौशल्य दर्शविते. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने मार्गदर्शक दस्तऐवजाच्या विकासाचा मुख्य उद्देश हा आमच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी कुशल शिक्षकांची निर्मिती करणे हा आहे. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानक ही शिक्षकांना काम आणि आचरणात जास्तीत जास्त संभाव्य मानांकने साध्य करण्यासाठी जबाबदार असणारे व्यासपीठ प्रदान करते. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकामध्ये परिभाषित केल्यानुसार सामान्य मानांकने शिक्षकांच्या नैतिक मुल्ये आणि नैतिकता विषयाचे पुरेपूर ज्ञान, व्यावसायिक नाते संबंध आणि व्यवसाय वाढीची योजना यावर लक्ष केंद्रित करतात.

उच्चतम दर्जाच्या क्षमता प्राप्त करण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण हे ध्येय सध्या करण्यासाठी सर्व संबंधित व्यक्ती आणि संस्थांचे मला सहकार्य मिळेल अशी मला अशा वाटते.

---

## संदेश



केसांग यांगजोम शेरपा

भारतीय राजस्व सेवा

सदस्य सचिव, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद, नवी दिल्ली

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे ने वैधानिक संस्था म्हणून भारतातील शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी अनेक पुढाकार घेतले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात २०२० दर्जेदार अध्यापन आणि दर्जेदार शिक्षण प्रणालीची एक आवश्यक पूर्वतयारी म्हणून गुणवान शिक्षकांकडे पहिले जाते. त्या अनुषंगाने, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे ने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात २०२० च्यापॅरा ५.२० मध्ये कल्पना केल्याप्रमाणे शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांवर मार्गदर्शक दस्तऐवज तयार करण्यात आलेला आहे. मार्गदर्शक दस्तऐवजात दिलेल्या मानकांमध्ये शिक्षकांसाठी व्यावसायिक मानकांचा तक्ता आहे, शिक्षकांनी काय करावे याचे वर्णन त्यात केले आहे. त्यांनी अध्यापन कार्य कसे करावे आणि २१ व्या शतकातील प्रभावी अध्यापनाकडे त्यांची कारकीर्द वाढवावी यासाठी ही मानांकने उपयुक्त ठरतील. विविध स्तरावरील कौशल्य आणि व्यवसायाच्या विविध टप्प्यांवर शिक्षकाकडून आवश्यक असलेल्या अपेक्षा आणि कौशल्यांचा समावेश शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांत केला जाईल.

शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांतील मार्गदर्शक दस्तऐवज विकसित आणि संरचित करण्याच्या प्रयत्नांना पाठींबा देणाऱ्या सर्व वरिष्ठांचे आणि मसुदा समिती सदस्यांचे मी आभार मानते. माझ्या तर्फे राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे च्या संपूर्ण टीमचे अभिनंदन.

# विषयसूची


| अनु.क्र. | आशय | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | **प्रस्तावना** | **1** |
| २. | **अध्यापन: एक व्यवसाय** | **3** |
| २.१ | अध्यापन म्हणून व्यवसाय | 3 |
| २.२ | व्यावसायिक मानके समजावून घेणे | 5 |
| २.३ | शिक्षकांसाठी आणि अध्यापनसाठी व्यावसायिक मानकांचे महत्त्व | 5 |
| ३. | **शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने (एन.पी.एस.टी)** | **7** |
| ३.१ | शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांची प्रासंगिकता | 7 |
| ३.२ | शिक्षकांसाठी व्यावसायिक मानांकने | 8 |
| ३.३ | क्षमतांची वाढ आणि विकास | 12 |
| ३.४ | शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने | 13 |
| ४. | **शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचा आराखडा** | **14** |
| ४.१ | मानक १: मूळ मुल्ये आणि नैतिकता | 14 |
| ४.२ | मालक २: ज्ञान आणि अभ्यास | 14 |
| ४.३ | मालक ३: व्यावसायिक वाढ आणि सराव | 15 |
| ५. | **अंमलबजावणी** | **22** |
| ५.१ | कृतियोजना | 22 |
| ५.२ | लागू करणे | 23 |
| ५.३ | नियत कालिक पुनरावलोकन | 23 |
| ६. | **शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकनांच्यावर आधारित मूल्यांकन साधने फ्रेमवर्क (सूचना देणारा तक्ता)** | **24** |
| ७. | **एनपीएसटी वर एनसीटीक्यूची डिजिटल आधारभूत संरचना योजना** | **35** |

| | | |
|---|---|---|
| ८. | चित्रांची सूची | 37 |
| ९. | संक्षेपाक्षर | 38 |
| १०. | संदर्भ ग्रंथ | 39 |
| ११. | शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानक तज्ञांची समिती | 40 |

# १. प्रस्तावना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये शिक्षक हा भारतातील शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी आहे. शिक्षण ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे जी प्रत्येक नागरिकाच्या जीवनावर परिणाम करते त्या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका महतत्वाची असते. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने सर्व विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट शिक्षणासाठी समान संधी मिळावी म्हणून शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांत शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने  आश्वासन देते की सर्व शिक्षक उत्साही, स्वप्रेरीत, उच्च पात्रताधारक चांगले तयारीत आणि सर्व विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर शिकवण्यासाठी सुसज्ज असले पाहिजेत. अशाप्रकारे, अध्यापन व्यवसायात बुद्धिवान व्यक्तींना आणणे ही काळाची गरज आहे.

शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने विविध करिअर टप्प्यांवर शिक्षकांचे गुण ओळखण्यास मदत करतात. याच बरोबर शिक्षकांची तयारी, सराव आणि कार्यप्रदर्शन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करते. मानांकने आणि संबंधित धोरणे मूलभूत शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने २०२० तत्त्वांशी सुसंगत आहेत. जे शिक्षण व्यवस्थेला मार्गदर्शक ठरतील आणि सर्वांना उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने २०२० च्या धोरणात्मक उपक्रमांना समर्थन देतील. सेवापूर्व शिक्षक शिक्षण कार्यक्रमाची रचना करण्यात आणि शिक्षक करिअर व्यवस्थापनाच्या सर्व पैलूंचे निर्धारण करण्यात शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने मदत करेल.

शिक्षकांच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचे फळ विद्यार्थ्यांना मिळेल. शिक्षकांसाठी व्यावसायिक मानांकने विविध करिअरच्या टप्प्यांवर आणि कौशल्याच्या विविध स्तरांवर शिक्षकांकडून काय अपेक्षित आहे, तसेच प्रत्येकासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची रूपरेषा दर्शवेल. इ.स.२०३० मध्ये राष्ट्रीय स्तरावर व्यावसायिक मानकांचे पुनरावलोकन आणि दुरुस्ती केली जाईल. व्यावसायिक मानकांचे पुनरावलोकन आणि सुधारित तत्त्वे यांचे राष्ट्रीय पातळीवर इ.स.२०३० साली आणि त्यानंतर दर १० वर्षांनी केले जाईल. त्यामध्ये व्यवस्थेची आणि प्रभावाची वस्तुनिष्ठ चिकित्सा केली जाईल.

राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एन.सी.टी.ई) ही एक वैधानिक संस्था आहे जी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद कायद्याद्वारे १९९३ साली स्थापन करण्यात आली आहे. देशभरात सेवापुर्वा आणि सेवांतर्गत शिक्षकांसाठी या धोरणाचे नियोजनपूर्वक समन्वय साधला जाईल ते सर्वांवर बंधनकारक राहील. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने ची घोषणा २०२१ च्या अर्थ संकल्पात शिक्षण मंत्रालय च्या आदेशानुसार करण्यात आली होती आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे ला हे कार्य पूर्ण करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने च्या विविध पैलूंवर विविध घटकांकडून मिळालेली माहिती आणि सूचनांवर आधारित शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने यांचा दस्तऐवज तयार करण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करण्यात आली होती. विविध घटकांकडून मिळालेली माहिती व सूचनांनुसार समितीचे गठन करण्यात आले होते. My NEP २०२० पोर्टलचा वापर करून एप्रिल २०२१ मध्ये इंटरनेटच्या द्वारे प्राथमिक संशोधन हाती घेण्यात आले. हा दस्तऐवज तयार करण्यासाठी निम्नस्तरा वरून माहिती आणि सूचना व प्रश्नावली संकलित करण्यात आल्या.

त्यानंतर दुय्यम संशोधनाद्वारे निवडक लक्ष्य माहितीदात्या कडून प्रश्नावलीद्वारे विशिष्ठ टिपण्या/इनपुटस माहिती मागविली गेली.

चार देशांच्या दस्तऐवजांच्या तुलनात्मक अभ्यासाचा अहवाल आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम पद्धतींची पायाभरणी करण्यासाठी तयार करण्यात आला. तज्ञ समितीने केलेल्या अनेक चर्चा आणि उजळणीद्वारे शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने वरील प्राथमिक मसुदा विकसित करण्यात आला आणि १७ नोव्हेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे वेबसाईटवर आणि My Gov पोर्टलवर सर्वजनिक पुनरावलोकनासाठी प्रसिद्ध करण्यात आला. त्याच बरोबर, शैक्षणिक, शैक्षणिक प्रशासक, एस.सी.ई.आर.टी, शिक्षक, विभागप्रमुखासह, डाइट चे मुख्याध्यापक, शिक्षक (सार्वजनिक/ खासगी), स्वयंसेवी संस्था इतर भागधारक यांच्याकडून प्राथमिक स्तरावरील कर्मचारी माहिती गोळा करण्यासाठी शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांच्या प्राथमिक मसुद्यावर देशभरात खुल्याचर्चा आयोजित करण्यात आल्या होत्या.

त्याचवेळी, शिक्षकांशी प्राथमिक पातळीवर सल्ला मसलत करण्यात आली. प्राथमिक मसुद्यातील वर्णन कर्त्यांवरील माहितीसाठी तसेच शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांच्या दस्तऐवजात नमूद केलेल्या कौशल्यांचे मूल्यांकन आणि मूल्यमापनासाठी साधने/ पद्धतींवर सूचना मिळवण्यासाठी देशभरातील प्राचार्य, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद या संस्था संशोधनाचा तिसरा स्तर असल्याने शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचा अंतिम मसुदा तयार करण्यासाठी संबंधित घटकांची संकलित माहिती/ सूचना वापरल्या गेली आणि त्या २९ मार्च २०२२ रोजी शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांच्या निर्मितीसाठी स्थापन केलेल्या समिती समोर ठेवण्यात आल्या. प्राथमिक पातळीवरील नमुना म्हणून केंद्र सरकारच्या मालकीच्या ७५ शाळांमध्ये (२५के.वी.एस, २५एन.वी.एस, २५सी.बी.एस.सी) आणि देशभरातील १९७५ शिक्षकांसह राष्ट्रीय व्यावसायिक मानकांच्या मार्गदर्शक दस्तऐवजाची अंमलबजावणी आणि परिणाम मूल्यमापन प्रायोगिक तत्त्वावर केले गेले आहे.

शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचे परिच्छेद ५.२० राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये सूचित केल्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांसाठी उच्च गुणवत्तेच्या शिक्षणात समान प्रवेशाचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे शालेय शिक्षण संदर्भात आदेश प्राप्त करण्यासाठी शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचे मार्गदर्शक दस्तऐवज वकसित केले गेले आहे. ज्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना उत्स्फूर्त, प्रेरित, उच्चपात्र, व्यावसायिक प्रशिक्षित आणि सुसज्ज शिक्षकांद्वारे शिकवले जाते. शिक्षक कार्यप्रणाली व्यवस्थापन आणि इतर मान्यता हे सर्व पैलू निश्चित करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. हे गुणवत्तेचे ध्येय आहे आणि वेगवेगळया स्तरावर शिक्षकांची क्षमता परिभाषित करते.

राष्ट्रीय शिक्षक गुणवत्ता केंद्र, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद मध्ये एक ऑनलाईन प्लॅटफॉर्म स्थापन करण्यात आला आहे. ज्यामध्ये शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने कार्यान्वित करण्यासाठी राष्ट्रीय व्यवस्था जबाबदार असेल. पुढे क्षमता निर्मितीसाठी अधिक संसाधन व्यक्ती/एजन्सी निर्माण करण्यासाठी भागधारक/अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सींचा कार्यक्रम हाती घेतला जाईल.

राज्ये / केंद्राशासित प्रदेश हे सरकार गुणात्मक मानांकने स्वीकारू शकतात आणि संस्था नवीन शैक्षणिक शालेय संरचनेनुसार (५+३+३+४) शिक्षकांच्या अपेक्षित कौशल्याची पूर्तता करण्यासाठी त्यानुसार त्याची अंमलबजावणी करू शकतात.

# २. अध्यापन: एक व्यवसाय

## २.१ अध्यापन म्हणून व्यवसाय

अध्यापन हा जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ट व्यवसायांपैकी एक मानला जातो आणि तो सामाजिक प्रगतिशी संबंधित आहे. प्राचीन काळी, शिक्षक हा समाजाचा सर्वात आदरणीय सदस्य होता आणि बहुतेक शिक्षित व्यक्तींना या व्यवसायात प्रवेश करण्याची परवानगी होती. शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेचे केंद्र होते आणि त्यांचेज्ञान, कौशल्ये आणि नैतिकता चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांची आवश्यकता होती. शिक्षण व्यवस्थेतील उत्क्रांती आणि शिक्षकांच्या बदलत्या भूमिकेमुळे दिर्घकालीन आणि शाश्वत राष्ट्र उभारणीसाठी शिक्षकांची गुणवत्ता वाढविणे हे अत्यंत महत्वाचे कार्य बनले आहे. सामाजिक कृती आणि सामाजिक पृच्छाचा एक प्रकार म्हणून अध्यापन ही एक सखोल नैतिक आणि दिशादर्शक प्रथा आहे ज्यामध्ये व्यावसायिकांनी खालील विकसन करणे गरजेचे आहे.

- मुलांची प्रेमपूर्वक काळजी घेणे आणि त्यांच्या सोबत प्रेमपूर्वक वागणे, विद्यार्थ्यांच्या विविधतेचा आदर करणे, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भातील मुलांना समजावून घेणे, संवेदनशीलता विकास करणे, त्यांच्या गरजा आणि समस्या जाणून घेणे आणि सर्व मुलांशी समानतेने वागणे.
- मुलांना फक्त ज्ञान प्राप्त करणारे समजू नका, तर शिक्षणातील अर्थपूर्णता निर्माण करण्यासाठीची त्यांची नैसर्गिक प्रवृत्ती वाढवा. पाठांतरापासून परावृत्त करा आणि अध्यापन आनंददायक, सहभागी आणि अर्थपूर्ण बनवा.
- अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांचे चिकित्सकपणे परीक्षण करा आणि स्थानिक गरजांचा अभ्यासक्रमाला योग्य असा संदर्भ द्या.
- अभ्यासक्रमात दडलेले ज्ञान दिले असे मानू नये.
- विद्यार्थी केंद्रित, कृतीयुक्त सहभागी अध्ययनाचे अनुभव आयोजित करा. ज्यात खेळ, प्रकल्प, चर्चा, संवाद, निरीक्षण, भेटी आणि अध्यायांचे आत्मचिंतन यांचा समावेश आहे.
- विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि वैयक्तिक वास्तविकतेसह शिक्षणाचे एकत्रीकरण करून, वर्गातील विविधतेला प्रतिसाद देणे.
- शांतता, लोकशाही जीवनपद्धती, समानता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुता, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक पुनर्रचनेसाठी आवश्यक मूल्यांना प्रोत्साहन देणे.

स्पष्टीकरण आणि संबंधित व्यक्तीमध्ये एक वाक्यता आणून विचार विनिमय करून मानकांवर एकमत होऊ शकते:

- चांगल्या अध्यापनाचा पैलूंबद्दल अधिक स्पष्टता आणि वचनबद्धता.
- चांगल्या अध्यापनाला सुधारित आणि समर्थनीय समर्थन करण्यासाठी आशया संदर्भातील विचारांची समज.
- शिक्षकांसाठी त्यांच्या व्यावसायिक सरावाचे आवश्यक परिणाम स्पस्ट करा आणि पुनरुच्चार करा आणि वर्ग खोल्यांना विद्यार्थी केंद्रित बनविण्यासाठी आणि त्यांचे आत्मचिंतन करण्यासाठी मार्गदर्शन करा.
- शिक्षकांना चांगले अध्यापन करण्यासाठी आणि करिअरच्या वाढीसाठी शिक्षकांची तयारी करण्यासाठी जैवप्रणाली आणि प्रदर्शन प्रणाली रचना व व्यवस्थापनाची अधिक माहिती.

शिक्षणाचा अधिकार (आरटीई) कायदा, २००९ शिक्षकांकडून अपेक्षा आणि अध्यापनाच्या गुणवत्तेची मागणी करतो ज्यामुळे मुलाला याची खात्री होईल की शाळेत सकारात्मक शैक्षणिक अनुभव असतील जे शिक्षणाद्वारे सक्षमीकरणाकडे नेतील. शिक्षणाचा हक्क (RTE) कायदा,२००९ मध्ये कल्पिल्याप्रमाणे हे असे असावे. **(कलम २९/२ RTE कायदा,२००९).**

- लोकशाही न्याय आणि शांततापूर्ण समाजला चालना देण्यासाठी भारतीय राज्य घटनेत अंतर्भूत केलेल्या मूल्यांशी सुसंगत.
- अध्ययनकर्त्याला सर्वांगिण विकासाकडे नेणारे शिक्षण.
- विद्यार्थ्याचे ज्ञान, क्षमता आणि प्रतिभा विकसित करा.
- विद्यार्थ्यांची शारीरिक आणि मानसिक क्षमता पूर्णतः विकसित करा.
- मुलांसाठी अनुकूल आणि विद्यार्थी केंद्रित पद्धतीने कृतियुक्त, शोध आणि शोधन याद्वारे शिकण्यास सक्षम करा.
- शक्य तितक्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या मातृभाषेत अध्ययन घडणे.
- भय, आघात आणि चिंतामुक्त शिक्षण होत असल्याचे सुनिश्चित करा आणि विद्यार्थ्याला मुक्तपणे संवाद साधण्यास मदत करा.
- समज आणि क्षमता या दोन्हींचे सतत सर्वसमावेशक मूल्यमापन समाविष्ट करा.

अशाप्रकारे प्रत्येक मुलाला सन्मानाचे जीवन जगण्यास सक्षम बनविणे.

भारतीय राज्यघटने पुढे शिक्षण सर्वसमावेशक आहे याची खात्री करण्यासाठी विशेष प्रयत्नांच्या गरजेकडे लक्ष वेधते आणि उपेक्षित समुदाय, भाषिक आणि सांस्कृतिक अल्पसंख्या गट, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासलेल्या व विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना आधार देते.

शिक्षणाचा अधिकार आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये मांडलेली शिक्षणाविषयक दृष्टीकोन सर्वसमावेशक शिक्षण आणि शाळेतील सर्व स्तरांवरील वर्ग खोल्यांमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांच्या विविधतेवर भर देते.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० विशिष्ट आव्हानांकडे लक्ष वेधते की शिक्षकांच्या अध्यापन पद्धती प्रतिसादात्मक असाव्यात: **(धोरणांची तत्त्वे)**

- अध्ययन पाठांतराकडून उच्चतम विचार हे चिकित्सक विचार पृच्छा, शोधन आणि २१ व्या शतकातील कौशल्ये याकडे कल असावे.
- बहुविद्याशाखीय, प्रायोगिक आणि कौशल्यपूर्ण अध्ययन बनवा.
- बहुभाषिकता
- विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या स्वदेशी वारशांचे मूल्य आणि एकात्मिक करण्यास सक्षम करा.

## २.२ व्यावसायिक मानके समजावून घेणे

व्यावसायिक मानांकने समजावून घेणे. मानांकने ही संज्ञा वेगवेगळया संदर्भामध्ये आणि देशांत वेगवेगळया अर्थासह परिभाषित केले जातात. मानांकने ही प्रत्येक व्यवसायात महत्वाची आहे ही अशी विधाने जी सामन्यात: अध्यापनाच्या किंवा सरावाच्या बाबतीत कायम साध्य करण्यासाठी सर्वात योग्य आहे याचे वर्णन करण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी वापरली जातात. अध्ययनासंदर्भात मानांकने हे अध्ययन निष्पत्ती अध्यापनाचे परिणाम म्हणून परिभाषित केले जातात. परंतु व्यवसायासंदर्भात मानकांना सक्षमतेचे परिणाम म्हणून परिभाषेत केले जाते, म्हणजे एखाद्या विशिष्ट व्यावसायिक क्षेत्रामध्ये सक्षम समजले जाण्यासाठी एखाद्याला काय माहित असले पाहिजे आणि ते करण्यास सक्षम असावे. दुसऱ्या शब्दांत दर्जेदार कामगिरीसाठी सक्षम मानले जाण्यासाठी मानकांचा वापर मैलाचा दगड किंवा व्यावसायिकांच्या कामगिरीचे मोजमाप करण्याचे साधन म्हणून वापरकेला जातो. मानांकने ही अशी विधाने आहेत जी व्यवसायात नेहमी मौल्यवान आहेत. दर्जेदार अध्यापन काय आहे आणि दर्जेदार शिक्षण काय हे अंतनिहित गृहीत धरते. शिक्षकांना काय माहित असले पाहिजे, कशावर विश्वास ठेवला पाहिजे आणि ते करण्यास सक्षम असले पाहिजे ही मूल्ये काही सूचित करतात हे विधान स्वत:च ठरवतात.

## २.३ शिक्षकांसाठी आणि अध्यापनासाठी व्यावसायिक मानकांचे महत्त्व

चांगल्या ईष्ट अध्यापनाचे वर्णन आणि शिक्षकांचे गुण आणि वैशिष्ट स्पष्टपणे अनेक धोरण दस्त्येवाजांमध्ये आढळतात.सर्व शिक्षा अभियान शिक्षण सुधारणेचे केंद्र प्रायोजित मिशन सुरु करून सेवांतर्गत प्रशिक्षणाची उद्दिष्टे सांगितली. या कल्पना राष्ट्रीय शिक्षक शिक्षण अभ्यासक्रम आराखडा (२००९) मध्ये मांडलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये अंतर्भूत आहेत आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये शिफारस

केल्यानुसार सेवापूर्व शिक्षक शिक्षण कार्यक्रमासाठी अभ्यासक्रम रचनेच्या विकास आणि संकल्पनेमध्ये अगदी अलीकडे आढळल्या आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने प्रस्तावित केले आहे की, व्यावसायिक मानांकने तयार केलेल्या आणि स्थापित केलेल्या व्यवसायावर नियंत्रण ठेवतील जे उत्तरदायित्व, देखरेख, व्यावसायिक विकास, प्रत्येक टप्प्यातील करिअरचे मार्ग आणि ऊर्ध्व गतिशीलता यांच्याशी जोडलेले आहेत. शिक्षकांसाठी व्यावसायिक मानकांचा एक संच शिक्षकांना सक्षम करू शकतो:

- शिक्षकांच्या कामाचे स्वरूप परिभाषित करणे.
- कार्य आणि सेवा अति निर्माण करणे.
- शिक्षक शिक्षण कार्यक्रम पुनर्रचना करणे.
- शिक्षकांची नोंदणी
- आजीवन अध्ययन आणि करिअर विकासाला चालना देणे.
- शिक्षक पत्रातेमध्ये एक समानता प्रस्थापित करणे आणि गतिशीलता आणणे.
- शिक्षकांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करणे.
- शिक्षक प्रेरणांना आधार देणे
- शिक्षकांची जबाबदारी/ कर्तव्य सुनिश्चित करणे.

मानकांच्या पैलूंवर जो रत्यांच्या विशिष्ट वापरावर आधारित भिन्न असू शकतो. तथापि, मानकांचा एक सामान्य संच हे सुनिश्चित करेल की शिक्षक आणि एक व्यवसाय म्हणून अध्यापानाशी संबंधित असलेल्या विविध बाबी संबंधित धोरणांमध्ये सुसंगत आहे.

# ३. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने

भारत ज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये बदल करत आहे. त्यामुळे २१ व्या शतकातील मागण्या पूर्ण करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करणे महत्वाचे बनले आहे. भारताचे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे २१ व्या शतकातील देशाचे पहिले ऐतिहासिक धोरण आहे आणि आपल्या देशाच्या वाढत्या विकासात्मक गरजा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. शिक्षक आपल्या मुलांचे भविष्य म्हजेच आपल्या राष्ट्राचे भविष्य घडवतात. सर्वांसाठी सर्वांगीण आणि दर्जेदार शिक्षणाचे उद्दिष्ट सध्या करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने अध्यापन व्यवसायाच्या विकासावर विशेष भर दिला आहे आणि शिक्षकांच्या सर्व सुधारणा केंद्रस्थानी ठेवल्या आहेत. अध्यापन व्यवसायात प्रवेश करण्यासाठी सर्वोत्कृष्ट आणि तेजस्वी व्यक्तींना प्रेरणा देण्यासाठी आणि शिक्षकांना त्यांचे कार्य शक्य तितक्या प्रभावीपणे करण्यास मदत करणे.

## ३.१ शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांची प्रासंगिकता

*"राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद्, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद् इत्यादी विविध स्तर आणि प्रदेशातील शिक्षक, शिक्षक तयारी आणि विकासात गुंतलेल्या तज्ञ संस्था, व्यावसायिक शिक्षणातील तज्ञ संस्था आणि उच्च-शैक्षणिक संस्था यांच्याशी सल्लामसलत करून, राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदे द्वारा (नॅशनल कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन), सामान्य व्यावसायिक मानक स्थापना संस्था (*Professional Standard Setting Body– PSSB) *या आपल्या पुनर्रचित नवीन स्वरुपात, २०२२ पर्यंत शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचा सर्वसामान्य मार्गदर्शक संच तयार करतील. नैपुण्य / स्तर याच्या विविध टप्प्यांवर शिक्षकांची भूमिका आणि त्या स्तरावर आवश्यक असणाऱ्या क्षमता, याविषयी असलेल्या अपेक्षांचा समावेश मानकामध्ये केला जाईल. यामध्ये कामगिरीच्या मूल्यांकनासाठी, प्रत्येक स्तराकरता ठरवलेल्या मानकांचा समावेश असेल आणि हे मूल्यांकन वेळोवेळी केले जाईल. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानका द्वारे सेवापूर्व शिक्षक – शिक्षण कार्यक्रमांच्या रचनेविषयी देखील माहिती दिली जाईल. यानंतर यांच्या कडून याचा अवलंब केला जाईल आणि त्याच्या आधारावर शिक्षक करिअर व्यवस्थापनाचे सर्व पैलू ठरवले जातील. त्यामध्ये कार्यकाळ, व्यावसायिक विकासाचे प्रयत्न, वेतनवाढ, पदोन्नती आणि इतर मान्यता यांचा देखील समवेश असेल. कार्यकाळ आणि वरिष्ठता याच्या आधारावर पदोन्नती किंवा पगारवाढ होणार नाही, तर ती फक्त अशा प्रकारच्या मूल्यांकनाच्या आधारावर केली जाईल. यंत्रणेच्या परिणामकारकतेचे काटेकोरपणे अनुभवजन्य विश्लेषण करून त्याच्या आधारावर २०३० मध्ये व्यावसायिक मानकांचे पुनरावलोकन केले जाईल व दर दहा वर्षांनी सुधारणा केली जाईल.*




आकृती १. शिक्षकांच्या तयारीचे चित्रण

**३.१.१ शिक्षक शिक्षण:** एन.पी.एस.टी ४ वर्षे, २ वर्ष आणि १ वर्षाच्या बी.एड या एन.ई.पी २०२० मध्ये संकल्पित केल्यानुसार सेवापूर्व शिक्षक शिक्षण कार्यक्रमांच्या रचनेची माहिती देईल.

**३.१.२ शिक्षक भूमिका व्यवस्थापन:** शिक्षकांकडून अपेक्षित असलेल्या विविध स्तरावरील कौशल्य/टप्प्यावरील शिक्षकांची भुमिका आणि त्यात त्या टप्प्यासाठी आवश्यक क्षमता यांचा मानकांमध्ये समावेश असेल. प्रत्येक टप्प्यासाठी, कार्यक्षमतेच्या मूल्यांकनासाठी मानकांचा समावेश  एन.पी.एस.टी करेल.

**३.१.३ शिक्षक करिअर व्यवस्थापन:** शिक्षक कारकीर्द व्यवस्थापनामध्ये सर्वपैलू, कार्यकाळ, व्यावसायिक प्रयत्न, पगारवाढ, पदोन्नती आणि इतर मान्यतांसह समवेश असेल.

**३.१.४ शिक्षक व्यावसायिक विकास:** शिक्षकांना आत्मसुधारणेसाठी आणि त्यांच्या व्यवसायातील नवीनतम नवकल्पना आणि प्रगती जाणून घेण्यासाठी सतत संधी द्याव्यात.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार २०२०, शिक्षकांची तयारी एक अशी प्रक्रिया आहे ज्यासाठी बहुविद्या शाखीय दृष्टीकोन आणि ज्ञान, अभिवृत्ती आणि मूल्यांची निर्मिती आणि सर्वोत्तम मार्गदर्शकांच्या अंतर्गत विकास आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकांना भारतीय मूल्ये, भाषा, ज्ञान, आचार – विचार आणि परंपरांच्या आधारे शिक्षण अध्यापन शास्त्रातील नवीनतम प्रगतीमध्ये पारंगत असणे आवश्यक आहे. एन.पी.एस.टी हे शैक्षणिक गुणवत्ता आणि भारतातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक परिणाम सुधारण्यासाठी काय आवश्यक आहे हे याचे सार्वजनिक विधान आहे. ही मानांकने मार्गदर्शक विधानांचा एक संच असेल जी करिअरच्या वेगवेगळया टप्प्यांवर तज्ञांच्या विविध स्तरांवर शिक्षकांच्या भूमिकेच्या अपेक्षा भाषित करते. २१ व्या शतकातील शाळांमध्ये अध्यापन करिअरच्या टप्प्यांत अध्ययनासाठी प्रभावी अध्यापन कसे असेल आणि शिक्षक म्हणून सराव करण्यासाठी कोणती क्षमता आवश्यक आहे हे देखील मानांकने परिभाषित करतात.

## ३.२ शिक्षकांसाठी व्यावसायिक मानांकने

शिक्षकांसाठी व्यावसायिक मानकांची चौकट संबंधित स्पष्ट आणि अंतर्भूत आहे. चांगल्या शिक्षकांचे गुण आणि चांगले अध्यापन या व्यतिरिक्त, ते भारतातील अध्यापन आणि शिक्षक निर्मितीवर संशोधनावर लक्ष केंद्रित करते आणि त्याच संदर्भात, ते शिक्षक आणि अध्यापनाची गुणवत्ता परिभाषित करतात आणि मूल्यमापन करण्याच्या उपक्रमांची रूपरेषा देखील देते.

**क. क्षमता**

शिक्षकांसाठी व्यावसायिक मानके तयार करताना, अध्यापन व्यवसायासाठी अत्यावश्यक असे ओळखल्या जाणाऱ्या क्षमतांच्या सामान्य मानकांच्या संचाकडे लक्ष आणलं जात आहे. योग्यतेशी आमचा अर्थ ज्ञान,कौशल्ये,समज,मूल्ये, दृष्टिकोन आणि इच्छा यांचे संयोजन एखाद्या विशिष्ट क्षेत्रात प्रभावी, एक चांगले व्यक्तिमत्वाला घडवून आणतात.

### ख. क्षेत्र

सराव (पूर्व – शिक्षण, अध्यापन दरम्यान आणि अध्यापनानंतर) परस्पर संबंधित क्षेत्र आहेत आणि दोन्ही विश्वास, कौशल्य संप्रेषण क्षमता, व्यावसायिक ओळख, नैतिकता, मुल्ये आणि स्वभाव यांच्याशी संबंधित आहेत खालील तीन क्षेत्र मानांकने म्हणून ओळखले जातात:

1. मूळ मूल्ये आणि नीतिमूल्ये
2. ज्ञान आणि सराव
3. व्यावसायिक वाढ आणि विकास

### ग. शिक्षक प्रोफाइल

अध्यापनात सुधारणे आणि नैपुण्याच्या विकासाची कल्पना ही आदर्श अध्यापनाच्या वाढीची प्रकृती आणि प्रगतीचे संकेत देण्यासाठी तयार केली जाते- सुधारणा आणि वाढीसाठी आकांक्षा आणि मार्ग दोन्ही आणि तसेच व्यावसायिकांकडून उच्च मानकांची पूर्तता केली जात आहे हे ओळखण्यासाठी आधार तयार करणे. एन.पी.एस.टी साठी, खालील स्तर शालेय शिक्षणाच्या विविध टप्पांवर आणि विषय अध्यापनाचा क्षेत्रात सर्व अधिकार क्षेत्रांवर आणि अध्यापनाच्या क्षमतांवर लागू करण्यास म्हणून प्रस्तावित केले आहेत. शिक्षक काय करण्यास सक्षम आहेत आणि ते कोणत्या क्षेत्रात पुढे विकसित होऊ शकतात याबद्दल एक दृष्टीकोन तयार करण्यासाठी हे स्तर आणि त्यांचे वर्णन सक्षम करणारे म्हणून वापरले जातील. हे शिक्षकांना खालील स्तरांवर आत्मसात केलेल्या क्षमतांच्या पुराव्याच्या आधारे त्यांची नियुक्ती करण्यातही मदत करेल:

१. कुशल

२. प्रगत

३. तज्ज्ञ

शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने हा मार्गदर्शक दस्तऐवज आहे जो उच्च शिक्षक तयार करण्यात आणि गुंतलेल्या सर्व संबंधितांना मदत करतो. अपेक्षित तसे शिक्षक होण्याच्या निर्णयापासून ते त्यांच्या अध्यापन प्रवास पूर्ण करेपर्यंत शिक्षकांना एक स्पष्ट कौशल्य मार्ग प्रदान करते. दस्तऐवज शिक्षक शिक्षण संस्थांना दर्जेदार शिक्षक तयार करण्यासाठी मार्गदर्शन करतो.

विशिष्ट टप्प्यांवर पोहोचण्यासाठी पूर्व आवश्यक क्षमता म्हणून मानांकने परिभाषित आणि वर्गीकृत केली आहेत. ही अध्यापनातील गुणवत्ता आणि शिक्षक कौशल्ये आत्मसात करून आणि व्यवसायाच्या लक्ष्यापर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांचे पुरावे एकत्रित करून पूर्व आवश्यकता पूर्ण करेल. या मानकांची पृतता केल्यानंतर शिक्षक प्रमाणित होतो आणि औपचारिक रीत्या टप्प्या-टप्प्याने प्रगत होत जातो. शिक्षकाने अध्यापनाच्या सरावात प्राप्त केलेली क्षमता लागू करावी आणि पुढील व्यवसायाच्या टप्प्यासाठी कौशल्यांवर काम सुरु करावे. यशस्वी अध्यापन व्यवसायाच्या तयारीचा

प्रवास एखादी व्यक्ती शिक्षक शिक्षण कार्यक्रमात प्रवेश केल्याच्या पहिल्या दिवसा पासूनच सुरु केला जातो.

शिक्षक शिक्षण कार्यक्रमामध्ये (टी.ई.पी) अध्यापन व्यवसायाची तयारी करताना विद्यार्थी शिक्षकाने सुरुवातीच्या टप्प्यावर जे कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत त्याचा तक्ता एन.पी.एस.टी तयार करतो. म्हणून जेव्हा एखाद्या भावी शिक्षक अध्यापन व्यवसायात सामील होण्याचा निर्णय घेतो, तेव्हा त्यांची एन.सी.टी.ई मान्यताप्राप्त टी.ई.आई मध्ये नोंदणी केली जाईल. अध्यापन व्यवसायाच्या पहिल्या टप्प्यावर पोहोचण्यासाठी आवश्यक असलेल्या सक्षमतेच्या आधारित तयार केलेल्या अभ्यासक्रमवार संस्था विद्यार्थी शिक्षकांना शिक्षित करेल. ही मानांकने अभ्यासक्रम नियोजन आणि वितरणामध्ये सेवापूर्व शिक्षक शिक्षण संस्थानी पूर्ण केली जाणारी किमान मानांकने असतील. विद्यार्थी शिक्षकत्यांच्या सुरुवातीच्या शिक्षक प्रशिक्षणामध्ये शास्वत सराव आणि मार्गदर्शकांच्या सहाय्याद्वारे अध्यापन आणि शिकण्याची प्रक्रिया प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि वृत्ती विकसित करतील.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये प्रत्येकासाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टी.ई.टी) प्रस्थावित करण्यात आली आहे. विद्यार्थी – शिक्षकाने अध्यापनाच्या व्यवसायात प्रवेश करण्यासाठी शालेय टप्पे ही पूर्व आवश्यकता असेल. अशाप्रकारे, टी.ई.टी परीक्षा मोजेल आणि खात्री करेल की अशा उमेदवारांची पात्रता तपासली आहे आणि त्यांची टी.ई.टी गुणवत्ता त्यांच्या क्षमतांची व्याप्ती दर्शवेल. एकदा नवीन शिक्षक अध्यापन व्यवसायात स्थिर झाल्यानंतर त्याला/ तिला एन.पी.एस.टी आधारित व्यावसायिक तयारी करण्यासाठी मार्गदर्शन केले जाईल. शिक्षकाच्या क्षमतांचे मूल्यांकन कार्य-प्रदर्शन निर्देशिकाद्वारे (पी.आई) केले जाईल जे व्यवसायासाठी स्वीकारल्या जाणाऱ्या मानकां वरील कामगिरीची स्थिती दर्शवेल. टप्प्या-टप्प्याने क्षमता प्राप्त करण्यासाठी किमान कालावधी पाच वर्षे आहे. शिक्षकांची गुणवत्ता हमी आणि कार्य-प्रदर्शन निर्देशक राष्ट्रीय मिशन फॉर मेंटरिंग कार्यक्रमाशी जोडले जातील आणि उत्कृष्ट शिक्षकांना मार्गदर्शकांच्या गटामध्ये समविष्ट केले जाऊ शकते. हे विविध व्यक्तीमध्ये त्यांच्या व्यावसायिक विकासाकडे नेणारी एकत्रित अध्ययनाचा लाभ घेण्याची संधी देते.

प्राप्त कौशल्यांच्या आधारे शिक्षकांचे तीन भिन्न स्तर खालीलप्रमाणे आहेत:

**१. कुशल शिक्षक:**

व्यवसायाच्या टप्प्यावर अध्ययन आणि अध्यापनासाठी आवश्यक कौशल्ये प्रदर्शित करण्यासाठी शिक्षकाने व्यावसायिक दृष्ट्या स्वयंभू असणे अपेक्षित आहे. प्रविण शिक्षकांना व्यावसायिक विकास कार्यक्रम आणि त्यांच्या सरावामध्ये त्यांनी प्राप्त केलेले ज्ञान बळकट करण्यासाठी शालेय मार्गदर्शकांचे प्रोत्साहन उपलब्ध राहील. तज्ज्ञ मार्गदर्शक अशा गुणवत्ता धारक शिक्षकाला त्याचे अध्यापण कौशल्य विकसित करण्यासाठी साहाय्य करतील, एकदा की असा गुणवत्ता धारक शिक्षक उच्चतर गुणवत्ता प्राप्त करू शकला की त्याला प्रगत व्यावसायिक दर्जा प्राप्त करण्यासाठी पुढील मार्गदर्शन उपलब्ध केले जाईल. तशा संधी अशा गुणवत्ता धारक शिक्षकाला उपलब्ध करून दिल्या जातील. त्यामध्ये प्रगत अध्यापन

कौशल्ये प्राप्त करणे, अवगत झालेल्या कौशल्याचा वापर करून अध्यापन करणे यांचा समावेश राहील. उच्चतर व्यावसायिक दर्जाचा शिक्षक तयार झाला की त्या कौशल्यांचे मूल्यमापन कसे करावे याचे त्याला मार्गदर्शन केले जाईल. असा प्रगत/ निष्णात शिक्षक तयार झाला की तो अभ्यासक्रमातील घटक, उपघटक निश्चित करणे, त्यासाठीची शैक्षणिक साधने निवडणे, पुस्तकाचा अर्थपूर्ण वापर करणे, अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करणे याचा विद्यार्थी केंद्रित विचार करून विद्यार्थ्यांसोबत अर्थपूर्ण संवाद करू लागेल. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत अध्ययनाचा गरजांची निश्चिती करणे, पालक/ शाळा व्यवस्थापन आणि या संबंधित घटकामध्ये परस्पर संवांद प्रस्थापित करणे, त्यातून लोकशाही, संविधानिक प्रथा, परंपरा याची जोपासना करणे इत्यादी बाबी असा प्रगत शिक्षक ओळखू लागेल.

**२. प्रगत शिक्षक :**

या व्यावसायिक अवस्थ्येमध्ये शिक्षकाने अध्ययन – अध्यापन प्रक्रियेतील उच्चतम दर्जाची कौशल्ये आणि गुण प्रत्यक्ष वापरात आणावीत असे अपेक्षित आहे. अशा शिक्षकाने आपले गुण प्रत्यक्ष वापरात आणावीत असे अपेक्षित आहे. अशा शिक्षकाने आपल्या व्यवसायातील उच्चतम क्षमता व कौशल्ये धारण करावीत. असा शिक्षक इतर अनेक शिक्षकांसाठी एक आदर्श शिक्षक म्हणून स्वत:ला सिद्ध करावे. अशा शिक्षकांचे मूल्यमापन/ निरीक्षण त्यांचे मुख्याध्यापक/ वरिष्ठ अधिकारी करतील व त्याला/ तिला पुढील मार्गदर्शन करण्यासाठी अशा प्रगत शिक्षकाला आपापल्या विषयामध्ये उच्चतम गुणवत्ता व कौशल्ये विकसित करून कार्यरत व्हावे लागेल. त्यात वेगवेगळया कौशल्याचा सुसंगत वापर, नवीन अभ्यासक्रम व विविध अभ्यास गटानुसार सराव करणे यांचा समावेश राहील. अशा प्रगत शिक्षकाला विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत गरजा, अध्ययनातील गरजा पूर्ण करण्यासाठी कार्यक्षम/ कार्यरत रहावे लागेल.त्याला/तिला विद्यार्थ्यांच्या गरजा समजावून घेणे, तुलनात्मक विचार मांडणे, त्यांचा कार्य कारण भाव समजणे, अध्यापनात विविधता आणणे, समस्या सोडविणे अपेक्षित आहे. असा प्रगत शिक्षक विद्यार्थ्यांच्या तात्पुरता व दिर्घ कालीन गरजांची पूर्तता करण्यास व शाळा – समुदाय समाज यांच्यातील आव्हाने स्वीकारण्यास तत्पर असा असेल.

**३. तज्ज्ञ शिक्षक:**

या स्तरावर शिक्षकांनी मार्गदर्शक किंवा समन्वयस्क नेत्याच्या भूमिकेसाठी अपवादात्मक क्षमतेसह उच्च दर्जाचे मूर्त कौशल्ये धारण करणे अपेक्षित आहे आणि इतर शिक्षकांना त्यांची क्षमता सुधारण्यास तसेच शाळेच्या व्यावसायिक विकास कार्यक्रमाचे नेतृत्व करण्यास मदत करतील. कारकीर्दीच्या टप्प्यावर एक शिक्षक सातत्याने सर्वोत्तम स्तरावरील कामगिरी प्रदर्शित करेल. त्यांचा अध्यापन सराव सहकार्याने त्यांचे शिक्षण सराव वाढवण्यासाठी मार्गदर्शक सहकारी यांचे बरोबर कार्यरत राहील. याव्यतिरिक्त एक तज्ज्ञ शिक्षक सतत स्वत: च्या आणि त्यांच्या सहकार्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या गरजा लक्षात घेवून स्वत: चे व्यावसायिक ज्ञान आणि सराव विकसित करण्याचा प्रयत्न करेल. तज्ज्ञ शिक्षकांनी समन्वयक निरीक्षणामध्ये सहभाग घेतला पाहिजे आणि त्यांच्या स्वत; च्या आणि इतरांच्या

अध्ययनासाठी जबाबदार असले पाहिजे. कारकीर्दीच्या पुढील टप्प्यावर जाण्यासाठी तज्ज्ञ शिक्षक इतरांना मार्गदर्शन करतील. पुढील कारकीर्दीच्या टप्प्याशी संबंधित कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आणि पुरावे विकसित करण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले जाईल. तो /ती शाळांमध्ये शिक्षण समुदाय विकसित करून त्यांच्या स्वत:च्या अध्यापनाच्या पद्धतीत आणि इतरांच्या सुधारणेसाठी एक उच्चतम क्षमता प्रदर्शित करेल.

## ३.३ क्षमतांची वाढ आणि विकास

कोणत्याही व्यवसायामध्ये विविध अंगभूत कौशल्ये आणि क्षमतांची वाढआणि विकास शक्य आहे आणि हे अपेक्षित ही आहे. अध्यापनाशी निगडीत सर्व घटकांना जसे की ज्ञान मिळवणे, वृत्ती – प्रवृत्ती जोपासणे, कौशल्ये, श्रद्धा, मूल्ये, स्वभाव, विश्वास, विषय घटक/गाभा, विद्यार्थ्यांविषयी समज, समाज, शिक्षणाची ध्येय उद्दिष्टे व तात्विक अधिष्ठान अशा सर्वांसाठी वाढआणि विकासाचे तत्व लागू होते:

**क. अनुभव-** शिक्षकांचे अनुभव आणि त्याचा प्रत्यक्ष उपयोग हे त्याची/तिची जाण अधिकाधिक वाढवते. तसेच अध्यापनाचा सराव, ज्ञानाची सखोलता, शैक्षणिक सिद्धांत आणि श्रद्धांची ओळख, त्यांचे संदर्भ, विद्यार्थ्यांची अध्ययन प्रक्रिया, शैक्षणिक ध्येय उद्दिष्टे यांची समाज वाढवण्यात मोलाचा वाट असतो. सुरुवातीला अध्यापनाचा सराव आणि त्यातील नियमितपणा यावर शिक्षकांचे लक्ष केंद्रित राहते. यात सेवेच्या ठिकाणच्या गरजा, मर्यादा आणि व्यवसायाच्या गरजा यांचाही सहभाग असतो. हे कोणत्याही व्यवसायास लागू होणारे तत्व आहे. नंतर अध्यापनावर लक्ष केंद्रित होवून, त्याचा सराव झाल्यावर शिक्षकाला मानसिकदृष्ट्या मोकळा वेळ मिळू लागतो. यामुळे तो स्वयं अध्ययन करून शैक्षणिक ध्येय साध्य करण्यासाठी तयार होतो. त्याच्या/तिच्या शिक्षक – प्रशिक्षणामध्ये शिक्षकाकडून त्याने/तिने आत्मसात केलेली मूल्ये, ज्ञान आणि सिद्धांत यांचे महत्त्व जाणवू लागते. व्यवसायाची ओळख आणि समज यांचाही त्याला अर्थ समजायला लागतो. सर्वच शिक्षक याच अवस्थेतून/प्रक्रियेतून विकसित होत जातात आणि प्रगत होतात.

**ख. क्षेत्र भेट आणि संवाद देवाण-घेवाण:** व्यावसायिक अध्ययनाचे सामाजिक तत्व आता सर्वजण मान्य करतात. सहाध्यायी आणि सहकाऱ्या समवेत अध्ययान आणि ‘इतर ठिकाणी हे कसे केले जाते’ याचा प्रत्यक्ष अनुभव हे शिक्षकांसाठी अध्ययनाचे महत्त्वाचे मार्ग आहेत. शिक्षकांची वाढ आणि विकासासाठी त्यांचा चांगला उपयोग होतो. विविध कार्यशाळा, व्याख्याने, परिषदांना हजार राहणे, व्यावसायिक अध्ययन आणि सराव करणारे गटाशी सहभागी होणे आणि शिक्षणाव्यतिरिक्त वेगळ्याच ठिकाणांचा नव्याने अनुभव घेणे यातून प्रत्येक शिक्षक शिकत जातो. अशा सहभागातून त्याला व्यक्त होण्याची व आपला सहभाग नोंदविण्याची संधी उपलब्ध होते.

**ग. सातत्यपूर्ण व्यावसयिक विकास:** समक्ष हजर आणि कधी ऑनलाईन कार्यशाळा, क्षमता वाढीसाठीचे सत्र/ अभ्यासक्रम यातून शिक्षकाला सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी

आणि नव्याने अध्ययनासाठी उत्कृष्ट संधी मिळत असतात. त्यातून नवे ज्ञान, नव्या पद्धती, नवी कौशल्ये, नव्या क्षमता विकसित होत जातात. नवे व्यावसायिक मार्ग सापडतात. यासाठी नव्या कल्पना आणि नव्या/ प्रगत पद्धती आत्मसात करणे ही एक सुवर्ण संधीच असते.

## ३.४ शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानांकने

अध्यापनातील गुणवत्ता तपासण्यासाठी मानांकने हा चांगला मार्ग आहे. उच्चतम दर्जा निश्चित करण्याचे ते एक साधन आहे. व्यावसायिक दृष्टीने मानकांचा उद्देश आणि त्याच्याशी संबंधित उपघटकानुसार त्यांचे वर्गीकरण केले जाते. अशी मानांकने विशिष्ट क्षेत्रासाठी काही ढोबळ तर काही सुस्पष्ट असू शकतात. अशी मानांकने शिक्षक व्यवसायासाठी ढोबळपण लागू करता येतील तसेच शिक्षकांच्या विकासाच्या उत्तरोत्तर प्रगत होत जाणाऱ्या टप्प्यासाठी लागू होतील अशी असू शकतात. अशी मानांकने प्रशिक्षित शिक्षक ते कुशल, निष्णात, तज्ज्ञ शिक्षक अशा प्रगतीच्या सर्व मार्गाचे निर्धारक ठरतात.




आकृती २. व्यावसायिक मानक एवम् सामर्थ्यसम्बन्धी चित्र

नवीन शैक्षणिक व्यवसायासाठी धोरण २०२० चे ध्येय साध्य करण्यासाठी तीन कार्यक्षेत्र निश्चित करण्यात आली आहेत. नमूद केल्याप्रमाणे तीन क्षेत्रांमधील मानके अध्यापन व्यावसायिकांच्या आजीवन कारकीर्दीच्या उत्क्रांतीसाठी विस्तृतपणे परिभाषित केली आहेत. एन.सी.आर.टी, एस.सी.आर.टी, विविध स्तरांवरील शिक्षक, शिक्षक तयारी आणि विकासातील तज्ज्ञ संस्था, आणि उच्च शिक्षण संस्था यांच्याशी सल्लामसलत करून शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक मानकांचा एक सामान्य मार्गदर्शक संच विकसित केला गेला आहे.

# ४. शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यवसायिक मानकांच्या आराखडा

शिक्षकांसाठी राष्ट्रीय व्यवसायिक मानकांच्या आराखडाचे करिअर आयामाचे वर्णन शिक्षकांच्या कामाच्या विशिष्ट पैलून्द्वारे केले जाऊ शकते. आराखड्याची मांडणी खालील तीन परस्पर संबंधित क्षेत्रांमध्ये केली जाते ज्याला 'मानक' म्हणतात ज्यात एकाधिक क्षेत्र समाविष्ट आहेत.

**४.१ मानक १: मूळ मुल्ये आणि नैतिकता**- या मानकामध्ये मूळ मुल्ये आणि नैतिकतेशी संबंधित क्षेत्र समाविष्ट असलीत जे शिक्षकांने विकसित करणे अपेक्षित आहे. शिकवण्याच्या व्यवसायात मूळ मुल्ये आणि नैतिकता महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. ते मार्गदर्शक तत्वे म्हणून कार्य करतात जे शिक्षकांच्या मूल्यांच्या व्यवसायिक विकासाला आकार देतात जसे की अखंडता,कटिबद्धता, व्यवसायिकता, प्रमाणिकपणा, आदर, विश्वर, आणि वर्गात परस्पर समज, आणि शिक्षकांना त्यांची शैक्षणिक कौशल्यात सतत सुधारण्यास आणि आजीवन शिकण्यास मदत करते. शिक्षक ही मूळ मुल्ये आणि नैतिकता जपून समानता आणि सर्व समावेशकतेचा पाया तैयार करतात.




आकृती ३. मूळ मुल्ये आणि नैतिकता

**४.२ मानक २: ज्ञान आणि अभ्यास** – करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर प्रभावीपणे कार्य करण्यासाठी शिक्षकाने त्यांच्या विद्यार्थ्यांबद्दल आणि अध्यापन शिक्षणशी संबंधित क्षेत्रांबद्दल काय जाणून घेणे आणि समजून घेणे अपेक्षित आहे हे या मानकामध्ये समाविष्ट आहे. अध्यापन शिक्षण प्रक्रिया आणि शिक्षण मूल्यमापन पार पडताना शिक्षक मुलांसाठी योग्य अध्यापनाचे अनुभव कसे तयार करतात हे देखील या मानकात प्रतिचित्रित होते. शिक्षकांचे ज्ञान आणि अभ्यासाचे क्षेत्र हे विस्तृत आणि विषयाचे ज्ञान आणि संबंधित शैक्षणिक सामग्रीचे ज्ञान, विषय सादर करण्याच्या पद्धतींचे ज्ञान, शैक्षणिक उद्दिष्टे आणि राष्ट्रीय शिक्षण प्रणालीचे ज्ञान, धोरणे आणि इतिहास, शिक्षणाचे सिद्धांताचे ज्ञान आणि शिकणाऱ्याच्या संदर्भाचे विशिष्ट ज्ञान आणि शैक्षणिक पद्धतींचे ज्ञान यांचा समावेश होतो. ज्ञान आणि अभ्यासमध्ये कार्य करण्याची क्षमता आणि प्रवृत्ती यांचा समावेश होतो आणि क्रिया आणि त्यांचे परिणामावर नियंत्रण ठेवण्याची भावना असणे: विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक आणि अर्थपूर्ण पणे गुंतवणे,

योजना बनवणे, अध्यापन, मुल्यांकन करणे आणि प्रतिबिंबित करणे, संसाधने निवडणे, विकसित करणे आणि उपयोगात आणणे, वर्ग, पुस्तकालय, प्रयोगशाळा, शोधयात्रा, कॉरिडोर आणि क्रीडांगणे यासह वेगवेगळया अभ्यासक्रम विषयक क्षेत्रांमध्ये शिक्षण अनुभवाचे संकल्पचित्र काढणे आणि पार पाडणे आणि सर्व विद्यार्थ्यांना सर्वांगीणपणे शिकण्यासाठी आणि विकसित होण्यासाठी सहाय्य करणे.




**आकृती ४. ज्ञान आणि अभ्यास वरील चित्रण**

**४.३ मानक ३: व्यवसायिक वाढ आणि विकास** – सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास च्या कार्यक्रमांमध्ये सहभागाद्वारे करिअरच्या प्रत्येक टप्प्यावर व्यवसायिक ज्ञान/क्षमता आणि अभ्यासामध्ये सुधारसाठी शिक्षकाने काय करणे अपेक्षित आहे याच्याशी संबंधित हे मानक क्षेत्रे समाविष्ट करणे. व्यवसायिक म्हणून शिक्षकांनी त्यांच्या व्यवसायिक ओळखीची कदर करणे आणि त्यांची क्षमता वाढवण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. योग्यतेच्या व्यवहारिक व्याख्येमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जे या कागदपत्रात वापरले आहे, योग्यतात सर्व प्रकारचे ज्ञान, स्वभाव आणि क्षमता समाविष्ट आहेत.




**आकृती ५. व्यवसायिक वाढ आणि विकासाचे चित्रण**

| मानक १: मूळ मुल्ये आणि नैतिकता | | | |
|---|---|---|---|
| मूळ मुल्ये आणि व्यवसायिक नैतिकता जी शिक्षकाने दर्शवणे अपेक्षित आहेत | | | |
| क्षेत्र | कुशल शिक्षक | प्रगत शिक्षक | तज्ज्ञ शिक्षक |
| भारताच्या संविधानात समाविष्ट केलेल्या सांविधानिक मुल्ये | सांविधानिक मूल्यांच्या संदर्भात तर्क करण्याची, प्राधान्यक्रम. चिंतन आणि समजवण्याची क्षमता | | |
| | माहितीला नैतिकतेने,जवाबदारीने वापरण्याची आणि विद्यार्थ्यांची प्रतिष्ठा राखणे हे सुनिश्चित करण्याची क्षमता | | |
| | भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ५१अ मध्ये दिलेल्या मुलभूत कर्तव्याची जाणीव आणि सराव | | |
| | कायदेशीर बंधने, नियम, अधिनियम, कार्यनीती, आणि विवादित परिस्थितीच्या बाबतीत नैतिकदृष्ट्या सबळ आणि जटील वातावरणात वाटाघाटी करण्याची क्षमता | | |
| व्यवसायिक संबंध | शिकणार्यांसाठीसह-अभ्यासक्रमाच्या संधी सुरु करण्यासाठी इतर व्यवसायिक आणि संस्थांशी संवाद साधणे | | |
| | बालकांच्या सर्वांगीण विकासामध्ये पालक आणि समुदायाची भूमिका ओळखणे आणि समजून घेणे | | |
| | संसाधने आणि इतर घोष्टीसमायिक करण्यासाठी स्वतःची शाळा आणि इतर संस्था आणि समुदाय यांच्यात परस्पर संबंध राखण्याची क्षमता | | |
| | शाळेच्या आत आणि बाहेरच्या विविध भागधारकांसह नातेसंबंध सांभाळण्याची आणि विकट आणि आव्हानात्मक वातावरणात वाटाघाटी करण्याची क्षमता | | |
| | सर्व विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशकपणे शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी संस्थेला कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी ध्येये आणि कार्यनीती निश्चित करण्याची आणि शाळेच्या सर्व सदस्यांसाठी अनुकूल कार्य वातावरण आणि कल्याण सुनिश्चित करणे | | |

| मानक २: ज्ञान आणि अभ्यास | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गातील प्रभाव आणि अध्यापन शास्त्रातील प्रभावी पद्धतींच्या संदर्भात शिक्षकाने काय जाणणे,समजून घेणे आणि सक्षम असणे अपेक्षित आहे | | | | |
| **क्षेत्र** | **उपक्षेत्र** | **कुशल शिक्षक** | **प्रगत शिक्षक** | **तज्ज्ञ शिक्षक** |
| प्रत्येक मुलाची विलक्षण क्षमता जाणणे, ओळखणे आणि वाढवणे | बालकांचा विकास आणि शिक्षणावर परिणाम | विकासाच्या वेगवेगळ्या अवस्था आणि विकासाच्या क्षेत्रांशी संबंधित सिद्धांतांची समज(संज्ञानात्मक, भाषिक, सामाजिक, भावनिक, आणि शारीरिक) | बालकांच्या विकासाचे ज्ञान आणि समजुतीचा उपयोग करून शिकण्याची पद्धती आणि वैयक्तिक विकास ओळखणे | समवयस्कांसाठी बाल विकास सिद्धांतांचे प्रारूप वअनुप्रयोग |
| | शिकणाऱ्यां ची विविधता | विविध प्रकारच्या शिकणाऱ्यांच्या विविधतेची स्पष्ट समज विकसित करणे (अभ्यासाची शैली, शिकण्याच्या गरजा,सामाजिक-आर्थिक स्थिती, संस्कृती, भाषा, कौटुंबिक रचना इ.) आणि या विविधतेला शाळा आणि वर्गात संबोधित करणे | विद्यार्थ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी आणि समावेशक वर्ग तयार करण्यासाठी शिक्षण संसाधनांच्या ज्ञानाचा वापर करणे | वर्गातील अनुभवाच्या आधारावर वैयक्तिक विद्यार्थ्यांच्या विविध गरजांचे निदान करण्याची आणि संबोधित करण्याची क्षमता |
| | दिव्यांग आणि विशेष सक्षम विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गरजा | विविध प्रकारच्या अक्षमताचे ज्ञान आणि त्यांच्या विशेष शिकण्याच्या गरजा तसेच प्रतिभाशाली मुलांच्या गरजा आणि त्यांच्या शिक्षणास प्रेरणा देण्यासाठी कार्यनीती दर्शवणे | वर्गातील विविध विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी विशेष गरजांच्या ज्ञानाचा उपयोग करणे | विशेष गरजा ओळखण्याची क्षमता ज्यासाठी तज्ञांच्या हस्तक्षेपाची आवश्यकता असते आणि अशा परिस्थितीत कसे संपर्क साधावा याबद्दल समवयस्कांना माहिती पुरवणे |
| विषयांचा ज्ञान,संकल्प नात्मक समज आणि उपयोजन | | विषय क्षेत्राचे ज्ञान, समज आणि अनुप्रयोग प्रसारित करण्याची क्षमता प्रदर्शित करणे | अंतः आणि आंतर-विषय सामग्रीची सहलग्न्ता आणि स्थानिक आणि स्वदेशी ज्ञानाचा संकलन करणे | विषय क्षेत्रातील होणारे विकासांशी अद्ययावत राहणे आणि अभ्यासक्रमाच्या देवघेव यात नवीन संकल्पना आणणे |
| शिक्षणक्रम | शिक्षणक्रम रचना | विषय/विद्याशाखातील अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रम विषेयकची स्पष्ट समज विकसित करणे | अंतः आणि आंतर-अभ्यासक्रम विषेयक संबंध समजून घेण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी सहकार्यां सोबत सहयोग करणे | नवीनतम सुधारणा आणि नवीन ज्ञान लक्षात घेऊन अभ्यासक्रमाची देवघेव यात बदल |

| मानक २: ज्ञान आणि अभ्यास | | | | |
|---|---|---|---|---|
| वर्गातील प्रभावआणि अध्यापन शास्त्रातील पद्धतींच्या संदर्भात शिक्षकाने काय जाणणे,समजून घेणे आणि सक्षम असणे अपेक्षित आहे | | | | |
| क्षेत्र | उपक्षेत्र | कुशल शिक्षक | प्रगत शिक्षक | तज्ज्ञ शिक्षक |
| विद्यार्थ्यांच्या शिक्षणसाठी सामग्री तयार करणे | निर्देशात्मक/शैक्षणिक रणनीती आणि शिक्षण वर्गीकरण | सामान्य शिकवण्याची कार्यनीती, अध्यापनात वापरल्या जाणाऱ्या वर्गीकरण, सामान्य शैक्षणिक पद्धती आणि संसाधने यांची समज | स्वतःच्या विषय/शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षण वर्गीकरण आणि शैक्षणिक धोरणांचा वापर करून विकासात्मक दृष्ट्या योग्य शैक्षणिक उद्दिष्टे/परिणाम विकसित करा | आकर्षक पाठ योजना तयार करण्यासाठी शिक्षण सिद्धांत निवडण्यासाठी निर्देशात्मक/शैक्षणिक कार्यनीती आणि शिक्षण वर्गीकरणाचा वापर करण्याकरता सहकाऱ्यांचे मार्गदर्शन करणे |
| | विभेदित निदेशन/ अध्यापन | विभेदित निदेशन/शैक्षणिक धोरणांचे स्पष्ट आकलन आणि समज दाखवणे आणि विद्यार्थ्यांचा शिक्षणातील सहभाग वाढविण्यात त्यांची भूमिका दाखवा | विद्यार्थ्यांना शिकवण्यात गुंतवून ठेवण्यासाठी विभेदित निदेशनांचा वापर | विद्यार्थ्यांची व्यस्तता वाढविण्यासाठी विकासात्मक दृष्ट्या योग्य भिन्न क्रियाकलाप आणि कार्यनीती तयार करण्यासाठी सहकाऱ्यांचे मार्गदर्शन करणे |
| | कार्यनीती जे विवेचनात्मक विचारप्रक्रिया, सर्जनशील विचार आणि/किंवा उच्चस्तरीय विचार कौशल्ये विकसित करतात | विवेचनात्मक आणि सर्जनशील विचार आणि/किंवा उच्चस्तरीय विचार कौशल्ये विकसित करणाऱ्या समान्य शैक्षणिक धोरणांची सखोल समज दर्शवणे | अशी कौशल्ये विकसित करण्यासाठी योग्य शैक्षणिक धोरणांचा वापर करा | या क्षेत्रातील अलीकडील सुधारणा आणि त्या ज्ञानावर आधारित नवीन शैक्षणिक कार्यनीती तयार करा |
